POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-८० ● मुंबई, बुधवार, २२ ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

### दिवाळीच्या पहिल्याच दिवशी दिल्लीतील हवा 'अतिशय खराब'

**दिल्लीकरांनी घेतला विषारी श्वास, हवेचा एक्यूआय ३०० च्या पुढे**

नवी दिल्ली : राजधानी दिल्लीने दिवाळीच्या सकाळी धुक्याच्या जाड थरासह दिवसाची सुरुवात केली. कारण शहराचा हवा गुणवत्ता निदेर्शांक (एक्यूआय) 'अतिशय खराब' या श्रेणीत घसरला असून तो ३०० एक्यूआयच्या पुढे गेला आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या 'समीर' ॲपनुसार, सकाळी ९ वाजता दिल्लीचा एकूण एक्यूआय ३३९ नोंदवण्यात आला. सुमारे ३८ निरीक्षण केंद्रांच्या आकडेवारीनुसार, शहरातील बहुतेक भागांमध्ये हवा गुणवत्ता पातळी ३०० च्या पुढे होती. आनंद विहार येथे एक्यूआय ४१४ तर वजीरपूर येथे ४१२ नोंदवला गेला, जे 'गंभीर' श्रेणीत मोडतात. बवाना (३६९), पुसा (३७१) आणि अशोक विहार (३९४) या ठिकाणी हवा गुणवत्ता ह्यअतिशय खराबह्ण श्रेणीत राहिली, तर श्रीअरविंदो मार्ग (१६५) आणि दिल्ली तांत्रिक विद्यापीठ परिसर (१९८) येथे तुलनेने थोडीशी चांगली स्थिती दिसली. यापूर्वी हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाने दिल्ली -एनसीआरमध्ये ह्यग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅनह्णचा (ग्रॅप) दुसरा टप्पा लागू केला आहे. हा निर्णय शनिवारी प्रदूषणाची वाढती पातळी आणि भारतीय हवामान विभाग तसेच भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेच्या अंदाजांवर आधारित आढावा बैठकीनंतर घेण्यात आला. दोन्ही संस्थांनी पुढील काही दिवसांत परिस्थिती आणखी बिघडण्याचा इशारा दिला होता. गेल्या बुधवारी, सर्वोच्च न्यायालयाने काही अटींसह दिल्ली-एनसीआरमध्ये ह्यहरित फटाकेह्ण विक्री करण्यास व फोडण्यास परवानगी दिली होती. दिवाळीच्या आदल्या दिवशी आणि दिवाळीच्या दिवशी सकाळी ६ ते ७ आणि रात्री ८ ते १० या वेळेत फटाके फोडण्याची परवानगी देण्यात आली होती. दरम्यान, सकाळी ८.३० वाजता दिल्ली शहरात किमान तापमान २०.२ अंश सेल्सियस नोंदवण्यात आले.

# मुंबईकरांनो सावधान!

## हवेची गुणवत्ता ढासळली, प्रदूषणात होतेय वाढ, एक्यूआय १६४ वर पोहोचला

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

दिल्लीसह मुंबईत वायू प्रदूषणाची पातळी दिवसेंदिवस वाढत आहे. ऐन दिवाळीच्या उत्सवांच्या काळात शहराची हवा पुन्हा एकदा चिंतेचे कारण बनली आहे. मुंबईतील एकूण वायू गुणवत्ता निदेर्शांक १६४ नोंदवला गेला, जो 'अस्वस्थ' श्रेणीत येतो. गेल्या आठवड्यापासून शहरातील हवेची गुणवत्ता सतत ढासळत असून, मध्यम श्रेणीपासून खराब श्रेणीकडे वाटचाल होत आहे.

**भायखळ्यात सर्वाधिक प्रदूषण**

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, शहरातील काही भागात प्रदूषण गंभीर पातळीवर पोहोचले आहे. भायखळा येथे अदक २१३ नोंदवला गेला, जो 'गंभीर' हवेची गुणवत्ता दर्शविते. त्यानंतर सिद्धार्थ नगर-वरळी २०४, वांद्रे हिल रोड १९१, चेंबूर १८७ आणि देवनार १८७ अशी नोंद आहे. या भागांमध्ये मंगळवारी (दि. २१) सकाळी दाट धुके आणि दृश्यता कमी



झाल्याचे पाहायला मिळाले.

**तुलनेने स्वच्छ हवा अनुभवली गेली**

काही भागात नागरिकांना तुलनेने स्वच्छ हवा अनुभवता आली. शिवडी येथे अदक ७१ नोंदवला गेला, जो 'मध्यम' श्रेणीत येतो. विलेपार्ले पश्चिम (११२), बांद्रा पूर्व (११६), कांदिवली पश्चिम (१२०) आणि कुर्ला (१३४) येथे हवा तुलनेने स्वच्छ होती.

**आजचे हवामान**

भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, आज मुंबईत आभाळ शुभ्र असले तरी उष्णतेचा आणि दमट हवामानाचा सामना करावा लागणार आहे. दिवसभरातील तापमान २६त्त ते ३५त्त दरम्यान राहण्याची शक्यता आहे. समुद्राच्या वाऱ्यांच्या अभावामुळे उष्णतेत अधिक वाढ होण्याची शक्यता आहे. क्टऊ अधिकाऱ्यांनी सांगितले की, उत्तर-पूर्व मान्सूनमुळे पश्चिम किनाऱ्यावर पूरक वाऱ्यांचा अभाव असून, त्यामुळे मुंबईसारख्या शहरांमध्ये उष्णतेत वाढ होत आहे.

**प्रशासनाचे आवाहन**

प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि हवामानशास्त्र विभागाने दिवाळीच्या दिवशी वायू प्रदूषणावर लक्ष ठेवण्यासाठी विशेष तयारी केली आहे. प्रशासनाने नागरिकांना फटाके फोडताना सुरक्षित पद्धतींचा अवलंब करण्याचे आणि योग्य स्थान निवडण्याचे आवाहन केले आहे.




## लाडक्या बहिणींना २१०० रुपये हप्ता? भाऊबीजला सरकारकडून खास ओवाळणी

■**मुंबई । प्रतिनिधी,**

राज्यातील लाडक्या बहिणींसाठी मोठी आनंदवार्ता आली आहे.मध्यप्रदेश सरकार या भाऊबीजाला बहिणींच्या खात्यात रक्कम जमा करणार आहे. राज्यातील महिलांना या भाऊबीजीला ऑक्टोबरचा हप्ता मिळेल की नाही याची कोणतीही अधिकृत माहिती सोर आलेली नाही. पण लाभार्थ्यांना १५०० रूपयांऐवजी २१०० रुपयांचा सन्माननिधी जमा होण्याची शक्यता बळावली आहे.

**२१०० रुपये हप्ता होणार?**

मंत्री नरहर झिरवळ यांनी या योजनेविषयी मोठे संकेत दिले आहे. गरज पडल्यास सन्मानिधीत लवकरच वाढ करण्याचा विचार करण्यात येईल, असे वक्तव्य त्यांनी केले. त्यामुळे लाभार्थ्यांना मोठी आर्थिक मदत मिळेल असे ते म्हणाले. पालघर जिल्ह्यातील डहाणू येथे आयोजीत सभेत त्यांनी हे वक्तव्य केले. त्यामुळे आता २१०० रुपये हप्ता कधी मिळेल याकडे लाडक्या बहिणींचे लक्ष लागले आहे.

**५७ महिलांना कर्ज पुरवठा**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतंर्गत लाभार्थी महिलांना आता कर्ज पुरवठा करण्यास सुरुवात झाली आहे. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दादर शाखेने व्यावसायिक कर्ज योजनेतून ५७ महिलांना कर्ज पुरवठा केला आहे. त्या धनादेशांचे वाटप मंत्री आदिती तटकरे यांनी केले. हा कर्ज धनादेश म्हणजे केवळ आर्थिक मदत नाही, तर राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांच्या उद्योजकतेला, त्यांच्या आत्मविश्वासाला दिलेले बळ असल्याची प्रतिक्रिया तटकरे यांनी दिली. राज्यातील लाडक्या बहिणींसाठी सुद्धा लवकरच ही योजना लागू करण्यात येणार आहे.




**योजना बंद होणार नाही**

मंत्री नरहरी झिरवल यांनी सांगितले की, मुख्यमंत्री माझी लडकी बहीण योजना कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही. ही योजना 21 ते 65 वर्षे वयातील महिलांना आर्थिक मदत करते. याचा लाभ राज्यातील लाखो लाभार्थी महिलांना होणार असल्याचे ते म्हणाले. ही योजना सुरू ठेवण्यासाठी लाडक्या बहिणींना ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यासाठी नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. दरमहा लाभार्थ्यांना 1,500 रुपयांची मदत करण्यात येते.

## पावसाला सुरुवात... वादळी वारे, विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट

■**मुंबई । प्रतिनिधी,**

राज्यभरात दिवाळीचा उत्साह असताना कल्याणमध्ये महाभयंकर पावसाला सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे आज दिवाळी सणाचा महत्त्वाचा दिवस आहे. आज लक्ष्मीपूजन आहे. पण लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आज अचानक वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. पुढचे काही तास अतिशय महत्त्वाचे असल्याची माहिती आहे. ठाणे जिल्ह्यातील कल्याण शहरात पावसाचं रौद्ररुप धारण केलेलं बघायला मिळत आहे. कल्याणसह बदलापूर, अंबरनाथ येथे देखील मुसळधार पाऊस सुरु आहे. वादळी वारे वाहत असल्याने अनेक भागांमध्ये वीज पुरवठा खंडीत झाला आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरात काळोखाचं वातावरण बघायला मिळत आहे. ऐकीकडे दिवाळी आहे. या दिवसांमध्ये घराघरात दिवे लावले जातात. घराबाहेर कंदील लावला जातो. पण ऐनवेळी आलेल्या पावसाने या सर्व उत्साहावर पाणी टाकलं आहे.

फक्त कल्याण नाही तर मुंबईच्या दादरमध्ये देखील आज पावसाने बॅटिंग केली आहे. सध्या दादरमध्ये रिमझिम तर कुठे मध्यम स्वरुपाचा पाऊस पडत आहे. इथे पावसामुळे सर्वसामान्यांच्या घरातील वीज गेलेली नाही. पण कल्याणमध्ये पाऊस खूप पडतोय. त्यामुळे अनेक भागांमध्ये वीज पुरवठा बंद झाला आहे. मुसळधार पावसाने अनेकांच्या आनंदावर विरझण पडलं आहे. हा पाऊस लवकर परत जावा, अशी प्रार्थना देवाकडे केली जात आहे.

## अत्याचाराची तक्रार मागे घेण्यासाठी महिलेकडे तगादा

# संतापात आरोपीचा वस्तऱ्याने गळा चिरला

■**नागपूर । प्रतिनिधी,**

त्याने तिच्यावर बलात्कार केला. त्याच्या त्रासाला कंटाळून तिने पोलिसांत तक्रार केली. नंतर तो ही तक्रार मागे घेण्यासाठी तिच्या मागे लागला. परत रोज त्रास देऊ लागला. एक दिवस रागाच्या भरात तिने त्याचे गळाच चिरला. सत्र न्यायालयाने तिला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. पण उच्च न्यायालयाने तिची शिक्षा कमी केली. भादंवि कलम ३०२चा हत्येचा गुन्हा भादंवि कलम ३०४ (२) म्हणजे हत्या करण्याचा हेतू नसताना राग, चिड किंवा अचानक परिस्थितीत केलेल्या कृतीमुळे एखाद्याचा मृत्यू होणे या गुन्ह्यात रुपांतरित केला व महिलेची जन्मठेप रद्द करीत तिला १० वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली.

न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फालके आणि न्यायमूर्ती नंदेश देशपांडे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. त्यामुळे आता या महिलेला १० वर्षांचा कठोर कारावास आणि ५ हजार रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. दंड न भरल्यास तीन महिन्यांचा अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असा आदेश देण्यात आला आहे. ही घटना वाशिम जिल्ह्यातील असून २००४ घडली होती. दोषी महिलेवर मृतक मधाओ गोते याच्या हत्येचा आरोप होता. त्यापूर्वी या महिलेने गोतेवर बलात्काराचा आरोप केला होता. त्या प्रकरणी वाशिम न्यायालयात खटला सुरू होती. मात्र मृतक गोते महिलेवर वारंवार खटला मागे घेण्यासाठी दबाव टाकत होता. २२ जून २००४च्या रात्री तो पुन्हा तिच्या घरी गेला आणि पुन्हा दबाव आणू लागला. संतापाच्या भरात महिलेनं उस्तऱ्याने त्याचा गळा चिरला आणि खलबत्त्याने डोक्यावर वार केला, ज्यामुळे त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून तपासाअंती महिलेवर आरोपपत्र दाखल केले. सत्र न्यायालयाने तिला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

या शिक्षेला तिने त्याला उच्च न्यायालयात आव्हान दिले. बचाव पक्षाने सांगितले की, मुळात या घटनेची माहिती तिने स्वतः पोलिसांना दिली, असे पोलिसांचे म्हणणे आहे. हत्येचा हा कबुलीजबाब तिने पोलिसांसमोर दिल्याने तो कायदेशीर पुरावा मानता येत नाही. साक्षीदारांच्या अनेक बयाणांमध्ये विरोधाभास आहे. त्यामुळे महिलेला खून करण्याचा हेतू होता, हे सिद्ध होत नाही. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून न्यायालयाने निरीक्षण नोंदविले की, मृतकाच्या वर्तनामुळे महिलेला प्रचंड संताप आला होता. तिचा उद्देश खून करणे नव्हता, मात्र तिच्या कृतीमुळे मृत्यू होऊ शकतो, हे तिला ठाऊक होते. त्यामुळे हे कृत्य भादंवि कलम ३०४ (२) म्हणजेच खून करण्याचा हेतू नसताना राग, चिड किंवा अचानक परिस्थितीत केलेल्या कृतीमुळे एखाद्याचा मृत्यू होणे या प्रकारात मोडते, असे न्यायालयाने नमूद केले. अखेर न्यायालयाने तिच्या शिक्षेत कपात केली.

### २९ वर्षीय तरुणीवर लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार

कल्याणमध्ये एका २९ वर्षीय तरुणीवर लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आरोपी प्रियकराने केवळ अत्याचारच केला नाही, तर पीडित तरुणीचा मोबाईल हॅक करून तिच्यावर पाळत ठेवली आणि तिचे अश्लील व्हिडीओ बनवले. एवढंच नाही तर तरुणीच्या कुटुंबीयांनाही धमक्या देत ब्लॅकमेल केल्याचं समोर आलं आहे. मोबाईलमध्ये साठवलेले अश्लील व्हिडिओ पोलिसांच्या हाती लागल्यानंतर संपूर्ण प्रकरणाचा पर्दाफाश झाला आहे. विनीत गायकर असे या आरोपी प्रियकराचे नाव असून कल्याण खडकपाडा पोलिस ठाण्यात त्याच्या विरोधात गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच आरोपी हा राजकीय पक्षाचा पदाधिकारी असल्याची माहिती आहे.



### महाराष्ट्रात भीषण अपघातांचा थरार सुरुच...

# २ दिवसात ५ जण ठार, दिवाळीत कुटुंबांवर पसरली शोककळा

■**मुंबई । प्रतिनिधी,**

गेल्या दोन दिवसात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी विविध अपघात झाले आहे. या अपघातांमध्ये एकूण ५ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर १३ जण जखमी झाले आहेत. त्यातच आता नुकतंच मुंबई-हैदराबाद महामार्गावर उमरगा तालुक्यातील डाळिंब या ठिकाणी भीषण अपघात झाला आहे. या अपघातात ४ जण जागीच ठार झाले. तर अन्य ठिकाणी एका युवतीचा अपघाती मृत्यू झाला आहे. त्यामुळे दिवाळीत काही कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

**धाराशिवमध्ये अपघात**

मुंबई-हैदराबाद महामार्गावर उमरगा तालुक्यातील डाळिंब येथील साईप्रसाद पेट्रोल पंपाजवळ मोठा अपघात झाला. यावेळा सफारी आणि ग्रँड विटारा या चार चाकी गाड्यांमध्ये भीषण अपघात झाला. हैदराबादकडे जाणारी ग्रँड विटारा आणि सोलापूरच्या दिशेने जाणारी सफारी गाडी यांची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातामध्ये ग्रँड विटारा गाडीतील चार जणांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य दोघे गंभीर जखमी आहेत. चालकांच्या हलगर्जीपणामुळे हा अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे.

**वाशिममध्ये सात जण जखमी**

वाशिमच्या रिसोड-हिंगोली मार्गावर मुंगसाजी नगरजवळ पिकअप आणि लक्झरी वाहनाची जोरदार धडक होऊन सात जण जखमी झाले आहेत. हे सर्व जखमी हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील शेतकरी आहेत. झेंडूची फुले विकून ते आपल्या गावी परतत असताना अपघात झाला. जखमींना तातडीने रिसोड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांना पुढील उपचारांसाठी वाशिम येथे रेफर करण्यात आले आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला आहे.

**इगतपुरीत तीन जण गंभीर जखमी**

इगतपुरी येथे मुंबई-नाशिक महामार्गावर वाडीवऱ्हे फाट्याजवळ पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाला. विरुद्ध दिशेने येणाऱ्या कारने समोरून येणाऱ्या आयशरला जोरदार धडक दिली. धडकेनंतर कार शेतात घुसली. या अपघातात कारमधील तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना पुढील उपचारांसाठी नाशिक येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

**लग्नाची पत्रिका देण्यासाठी गेलेल्या तरुणीचा मृत्यू**

सिंधुदुर्गमधील फोंडाघाट गांगोवाडी येथील निकिता सावंत ही युवती आपल्या लग्नाची पत्रिका देण्यासाठी मुंबईहून गावाकडे आली होती. सकाळी आपल्या सख्या भावासोबत मामाकडे पत्रिका देऊन परत येत असताना बस आणि दुचाकीच्या दुर्दैवी अपघातात तिचा मृत्यू झाला. येत्या ३ फेब्रुवारीला निकिताचे लग्न होणार होते. तर रत्नागिरी-गुहागर चिपळूण मार्गावर मच्छी वाहतूक करणारा टेम्पो उलटला. गुहागर-चिखली मार्गावर झालेल्या या अपघातात टेम्पोचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच या अपघातामुळे रस्त्यावर मच्छी पसरल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले. टेम्पोचा क्लीनर किरकोळ जखमी झाला आहे.

**तीन जनावरांना धडक**

बीड तालुक्यातील येळंब घाट येथील अहिल्यानगर-अहमदपूर रस्त्यावर सकाळी ८ वाजता एसटी बसने मागून आलेल्या ट्रकला धडक दिली आहे. या बसने रस्त्याखाली चालणाऱ्या दुचाकीसह तीन जनावरांना धडक दिली. यात दुचाकीस्वार अक्षय ढाणे गंभीर जखमी झाले, तर एक गाय दगावली.

पुण्यातील भोरमधील नसरापूर जवळील शिवगंगा नदीवरील पुलाजवळ रस्त्याच्या दुरावस्थेमुळे टेम्पो पलटी होऊन अपघात झाला. वेल्ह्याहून पुण्याच्या मार्केटमध्ये फुलं आणि भाजीपाला घेऊन निघालेला असताना, रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये आपटून हा टेम्पो पलटी झाला. यात सुदैवाने जीवितहानी झाली नाही. मात्र शेतकऱ्याच्या भाजीपाला आणि फुलांचे नुकसान झाले. नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे.



### स्वत:च्या ९ वर्षांच्या लेकीला दाखवले 'तसले' व्हिडिओ अन्...

# नवी मुंबईत पित्याचं विकृत रुप समोर

■**नवी मुंबई। प्रतिनिधी,**

नवी मुंबईतील कोपरखैरणे येथे एका धक्कादायक घटनेत एका पित्याने आपल्या नऊ वर्षांच्या मुलीसोबत लैंगिक आणि अश्लील चाळे केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कोपरखैरणे पोलिसांनी या नराधमाविरोधात विनयभंगासह पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून, त्याचा शोध सुरू आहे.

आरोपी हा पीडित मुलीच्या आईसोबत राहत असताना, त्याने मुलीला मोबाइलवर अश्लील व्हिडिओ दाखवून तिच्यासोबत गैरवर्तन केले. हा प्रकार मुलीच्या आईच्या लक्षात येताच तिने तातडीने कोपरखैरणे पोलीस ठाण्यात धाव घेतली.पीडित मुलीची आई मूकबधिर असल्याने पोलिसांनी तज्ज्ञांच्या मदतीने तिच्याशी संवाद साधून हा गुन्हा नोंदवला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने आपल्याच मुलीला अश्लील व्हिडिओ दाखवून तिच्यासोबत चुकीच्या पद्धतीने वागला.

पीडित मुलीच्या आईने धाडस दाखवत पोलिसांना माहिती दिली. आई मूकबधिर असल्याने संवाद साधणे थोडे कठीण होते, पण पोलिसांनी तज्ज्ञांची मदत घेऊन तिच्याकडून संपूर्ण माहिती घेतली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीविरोधात गंभीर गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोक्सो कायदा हा लहान मुलांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी बनवला गेला आहे.

या महिलेने असाही आरोप केला आहे की आरोपीने यापूर्वी तिच्यावर शारीरिक हल्ला केला होता आणि छळ केला होता. "आम्ही आरोपीवर लक्ष ठेवून आहोत आणि पुढील तपास सुरू आहे," असे कोपरखैरणे पोलिस ठाण्यातील एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

दरम्यान, एका वेगळ्या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहे, ज्यात एक महिला रस्त्यावर एका पुरूषाला चप्पलने मारताना दिसत आहे. ही घटना नवी दिल्लीमध्ये घडली असून, सध्या खूप चर्चेत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या पुरूषाने महिलेच्या मुलीसोबत गैरवर्तन केले होते. त्यामुळे महिलेने त्याला मारहाण करण्यास सुरू केले. व्हिडिओमध्ये महिला त्या माणसाला वारांवार चप्पलेने मारताना दिसत असून, आजूबाजूचे लोक केवळ सर्व तमाशा पाहताना दिसून येत आहेत.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# निवडणूक आयोग आता जनतेच्या न्यायालयात!




**निवडणूक आयोगाच्या कथित लोकशाहीविरोधी कारवायांविरोधात राज्यातील सर्व विरोधी पक्ष एकत्र येत १ नोव्हेंबर रोजी विराट मोर्चा काढणार आहेत. आयोगावर सत्ताधाऱ्यांचा वरदहस्त असल्याचा आरोप करत, या लढ्याला 'जनतेच्या न्यायालयातली लढाई' असे स्वरूप देण्यात आले आहे.**

पूर्वीच्या गोष्टींमध्ये राजाचे प्राण कुणा पक्षी-प्राण्यात सुरक्षित असत. अत्याचारी राजाचे निर्दालन करण्यासाठी त्या प्राण्याचा वेध घ्यावा लागे. सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी आपले प्राण, निवडणूक आयोगात लपवले आहेत! निवडणूक आयोगाच्या लोकशाहीविरोधी कारवायांविरोधात राज्यातील सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येत, येत्या शनिवारी १ नोव्हेंबरला विराट मोर्चाची हाक दिली आहे. निवडणुकी आधीच आयोगाचा पदार्फाश करत असताना प्रभावित पक्षांनी, सत्ताधारी पक्षांना या 'लोकशाही बचाओ आंदोलना'त सहभागी होण्याचे आवाहन करूनही, अपेक्षेप्रमाणे भाजप, शिंदे सेना आणि दादा राष्ट्रवादी पक्ष या आंदोलनापासून दूर आहेत. सत्ताधारी पक्षांचे प्राण आयोगात असल्याचे आणखीन दुसरे प्रमाण काय हवे! राज्यातील प्रभावित राजकीय पक्षांनी आयोगाच्या अधिकाऱ्यांना सलग दोन दिवस भेटून शास्त्रीय पद्धतीने व पुराव्यानिशी राज्य आणि केंद्रीय आयोगावरील आरोपाची जंत्री सादर केली. आयोगाने दोन दिवस घेऊनही समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. वर, दोन दिवसांनी त्यांनी जे भले थोरले प्रसिद्धीपत्रक जाहीर केले, त्यात दिल्लीतलाच उडवाउडवीचा खेळ मुंबईत लावल्याचे स्पष्ट झाले. विरोधी पक्षांनी याची तातडीने दाखल घेत, आयोगाच्या थातुरमातुर रंगसफेदीबाबत तीव्र आक्षेप घेतले आणि तेवढ्यावर न थांबता, लगोलग दिवाळी आटोपताच आयोगाच्या लोकशाहीविरोधी पवित्र्याविरुद्ध विराट मोर्चाची घोषणाही केली. आयोगाची लबाडी 'जनतेच्या न्यायालयात' खेचण्याचं राहुल गांधींनी दिल्लीत केलेले आवाहन, राज्यातील विरोधी पक्षांनी पुढे नेले. बिहारमधील विशेष सखोल पुनरीक्षण (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्ह्यू-एसआयआर) संदर्भात सर्वोच्च न्यायालयात जी केस सुरू आहे, त्यात ॲड. प्रशांत भूषण यांनी अलीकडेच आयोगाची लबाडी उघडकीस आणली आहे. एखादा सर्वसामान्य पक्षकार कोर्टात खरे बोलण्याची शपथ घेऊन खोटे बोलल्याचे उघड झाले, तर त्याला दंड वा शिक्षा होते. केंद्रीय निवडणूक आयोगच खोटे बोलत असेल तर काय? कोर्टाने एसआयआरवर बरेच ताशेरे ओढले. त्यासाठी आयोगाच्या विरोधाला न जुमानता आधार कार्डाचा पुरावा ग्राह्य धरायला, आयोगाला भाग पाडले. मात्र एसआयआरबाबतचे विरोधकांचे आक्षेप योग्य दिसत असूनही, एसआयआर रद्द करण्याचे वा ते न्याय्य व रास्त पद्धतीने करण्याचे स्पष्ट वा निःसंदिग्ध आदेश काही सर्वोच्च न्यायालयाने अद्याप दिलेले नाहीत. त्यामुळे राज्यातील प्रभावित पक्षांनी लढाई जनतेच्या न्यायालयात चालवण्याचे धोरण पुढे नेणे योग्य वाटते. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या एसआयआरविरोधी खटल्यात आयोगाने सांगितले होते की, 'याआधी २००३ साली एसआयआर झाले होते आणि त्यावेळी आयोगाने जे केले तेच आम्ही आता करीत आहोत.' मात्र वारंवार मागणी करूनही आयोगाने २००३ ची फाइल कधीच उघड केली नाही. ना सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या ७८९ पानी प्रतिज्ञा पत्रात, ना माहितीच्या अधिकारात, ना पत्रकारांच्या प्रश्नाच्या उत्तरादाखल. न्यायालयात याबाबत प्रश्न विचारल्यावरही आयोगाने मिठाची गुळणी घेणेच पसंत केले. १ जून २००२ रोजी आयोगाने जाहीर केलेला हा ६२ पानी दस्तावेज आता उघड झाला असून, त्यातून एसआयआर करण्याबाबतचे आयोगाचे तीनही दावे खोटे ठरले आहेत. २००३ साली मतदारांकडून यावेळप्रमाणे कोणतेही एन्यूमरेशन फॉर्म भरून घेतलेले नव्हते. आयोगाचा बूथ स्तरावरील अधिकारी घरोघर जाऊन पाहणी करून, यादीत स्वतःच आवश्यक त्या सुधारणा करीत होते. उघड झालेला आयोगाचा दुसरा लबाड दावा म्हणजे, 'त्यावेळी फक्त चारच पुरावे ग्राह्य होते. यावेळी आयोगाने ११ पुरावे ग्राह्य धरले'. प्रत्यक्षात २००३ साली सर्वसामान्य मतदारांकडून कसलेही पुरावे मागितलेच नव्हते. केवळ अन्य राज्यातून नव्याने आलेले वा जन्मतारीख, पत्ता यात सुधारणा आवश्यक असणाऱ्यांचेच संबंधित दस्तावेज मागितले गेले होते. आयोगाचा तिसरा, सर्वात मोठा खोटा दावा म्हणजे, 'त्यावेळी मतदाराच्या नागरिकत्वाची तपासणी आयोगाने केली होती'! त्यावेळच्या मार्गदर्शक सूचनांच्या ३२व्या परिच्छेदात स्पष्टपणे लिहिलेलं आहे की, नागरिकता तपासण्याचे काम आयोगाच्या अधिकाऱ्यांचे नाही! केवळ सरकारने एखादे क्षेत्र विदेशी नागरिक बहुल म्हणून घोषित केले असल्यास त्या भागात आणि एखाद्या नव्या मतदारचे कुणीच नातेवाईक तिथे मतदार नसल्यास, नागरिकता तपासणीची तरतूद त्यात आहे. बिहारपाठोपाठ देशभर क्रमाक्रमाने एसआयआर करण्याचे आयोगाने जाहीर केलेले आहे. त्यामुळे यानंतरच्या एसआयआरबाबत सर्वोच्च न्यायालयाकडून याआधारे स्पष्ट निर्देश अपेक्षित आहेत. प्रभावित विरोधी पक्षियांच्या शास्त्रोक्त व पुराव्यानिशी केलेल्या आरोपांना उत्तर न देणे असो, न्यायालयात चुकीचे प्रतिज्ञापत्र सादर करणे असो, नाहीतर आपल्या पत्रकार परिषदेत राजकीय शेरेबाजी करण्याचे आयुक्तांचे साहस असो, हे सगळे बळ आयोगाकडे आलंय कुठून? आयोगावर केंद्रातील सत्ताधाऱ्यांचा आणि दस्तुरखुद्द गृहमंत्र्यांचा वरदहस्त असल्यानेच लगातार हे लोकशाहीविरोधी वर्तन घडते आहे. निवडणूक आयोगाला विद्यमान सत्ताधाऱ्यांनी इतके अतिप्रचंड सुरक्षा कवच देऊन ठेवलेले आहे की, न्यायालयीन लढाईत काय आणि किती समाधानकारक परिणाम मिळतील, याबाबत शंकाच आहे. डिसेंबर २०२३ मध्ये जेव्हा १४६ विरोधी पक्षीय खासदारांना आकसाने निलंबित करण्यात आले, त्यावेळी संसदेने कोणतीही चर्चा न करता निवडणूक आयोगासंदर्भात १९९१ पासूनचा कायदा रद्द करून नवा कायदा पारित केला. यातील कलम १६ नुसार, ''मुख्य निवडणूक आयुक्त किंवा निवडणूक आयुक्त असलेल्या किंवा पूर्वी असलेल्या कोणत्याही व्यक्तीने त्याच्या अधिकृत कर्तव्याच्या किंवा कार्याच्या अंमलबजावणी दरम्यान किंवा कृती करताना किंवा कृती करण्याचा आशय व्यक्त करताना केलेल्या किंवा बोललेल्या कोणत्याही कृती, गोष्ट किंवा शब्दाबद्दल कोणतेही न्यायालय कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीची दखल घेणार नाही किंवा ती चालू ठेवणार नाही''. याच कायद्यात, आयुक्त नेमणुकीसाठीच्या मा. पंतप्रधान, विरोधी पक्षनेते व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश या समितीतून न्यायाधीशांच्या जागी मा. पंतप्रधान नियुक्त मंत्री नेमण्यात आले. याच कायद्यातील कलम ७(२) नुसार, ''मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांची नियुक्ती केवळ निवड समितीमधील कोणत्याही रिक्त पदामुळे किंवा तिच्या स्थापनेत कोणत्याही दोषामुळे अवैध ठरणार नाही'', अशी मेखही मारून ठेवलेली आहे. कारण या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना घाईघाईत हे बदल करण्यात आले होते. १२ डिसेंबरला राज्यसभेत, लगोलग २१ डिसेंबरला लोकसभेत हा कायदा पास करवून, २९ डिसेंबर २०२३ ला मा. राष्ट्रपतींची मंजुरी घेण्यात आली! लागलीच जानेवारी २०२४ च्या पहिल्या आठवड्यात या कायद्याविरोधात ३ केसेस दाखल झाल्या. सर्वोच्च न्यायालयाने कायद्याला स्थगिती न देता सुनावणी सुरू ठेवली. ९ मार्चला तत्कालीन आयुक्तांनी राजीनामा दिला. नव्या आयुक्तांच्या नेमणुकीची घाई होणार, हे पाहता ११ मार्चला आरोपकर्त्यांनी तातडीची सुनावणी मागितली. १३ मार्चला न्यायालयाने जाहीर केले की १५ मार्चला तातडीची सुनावणी घेऊ. त्या आधीच १४ मार्चला मा. राष्ट्रपतींनी त्यावेळी सहकार मंत्रालयात मुख्य सचिव असलेल्या ज्ञानेश कुमार यांच्या निवडणूक आयुक्त नियुक्तीचा आदेश जारी केला! नव्या कायद्यानुसार मा. पंतप्रधान, पंतप्रधान नियुक्त गृहमंत्री व तत्कालीन विरोधी पक्षनेते अधीर रंजन चौधरी यांच्या समितीने ही नियुक्ती केली असली तरी चौधरींनी, 'या नियुक्तीसाठीची नावे समिती बैठकीच्या केवळ दहा मिनिटे आधी दिल्याचे' सांगत समितीचा निर्णय अमान्य असल्याचे लिहून दिले होते. नियुक्तीपासून दैनंदिन कारभारापर्यंत सत्ताधाऱ्यांनी इतकी कडेकोट लोकशाहीविरोधी व्यवस्था लावून देत आपले प्राण निवडणूक आयोगात लपवल्यावर, विरोधी पक्षांना राजकीय लढाई आयोगापासूनच सुरू करावी लागणार आणि तीही जनतेच्या न्यायालयातच!

# संशयास्पद मतदार याद्यांमुळे संभ्रमाचे वातावरण!

भारताला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे पूर्ण झाली आहेत. लोकसभेची पहिली सार्वत्रिक निवडणूक ऑक्टोबर १९५१ ते फेब्रुवारी १९५२ मध्ये झाली. म्हणजेच पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीला आता ७३-७४ वर्षे होताहेत. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाच्या प्रजासत्ताकाला २५ वर्षांनी, २०५० मध्ये शंभर वर्षे पूर्ण होतील. अशी मोठमोठी पदकं आपण आपल्या छातीवर मिरवत राहू. पण गेल्या ७३-७४ वर्षांत आपण निकोप, निष्पक्ष, पारदर्शक निवडणूक घेतली आहे का? मग कशाचा अमृत महोत्सव साजरा करतो. यातून आपण खऱ्या अर्थाने लोकशाही देश झालो आहोत का, निवडणुकीपुरती तरी लोकशाही शिल्लक आहे का?

आधी राजे-रजवाड्यांनी राज्य केले. नंतर त्यांच्या वंशजांनी सो कॉल्ड लोकशाही मार्गाने निवडून येऊन सत्तास्थान कायम ठेवले. मग पक्ष काँग्रेस असेल, नाही तर भाजप असेल. या दोन्ही पक्षांसह आता शेकडो पक्ष निवडणुकीच्या माध्यमातून संसदेपासून महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका लढत आहेत. मात्र गेल्या एक, दोन दशकांपासून निवडणुकीचे समीकरण बदलले आहे. एकच पक्ष ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत सर्वत्र दिसत आहे. जगातील सर्वात मोठा पक्ष म्हणूनही या पक्ष नेतृत्त्वाने स्वतःची पाठ थोपटून घेतली आहे. पुढील ५० वर्षे आम्हीच सत्तेत असणार असे बावनकुळेंपासून अमित शहांपर्यंत सर्वांनी म्हणून झाले आहे.

सामान्य भारतीय माणसाची निवडणुकीबद्दलची मनोभूमिका आणि निवडणुकीच्या पॅटर्नचा विचार केला तर असं लक्षात येतं की देशात दर १०-१५ वर्षांनी सत्ताबदल झालेला आहे. कोणाचीच सत्ता ही सलग, सदासर्वकाळ राहिलेली नाही. मात्र भाजप नेत्यांमध्ये कायम सत्तेत राहण्याचा आत्मविश्वास नेमका कुठून येत आहे? याचाच शोध विरोधीपक्ष घेत आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा आणि त्यानंतर झालेल्या महाराष्ट्र, हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीचा धोंडाळा घेतल्यानंतर अणुबॉम्ब फोडला.

निवडणूक आयोगाच्या मतदार याद्या सदोष असल्याचा त्यांनी आरोप केला. काही लाख नावांची हेराफेरी केली जात असल्याचे ते म्हणाले. त्यासाठी त्यांनी कर्नाटकातील एका लोकसभा मतदारसंघाची केसस्टडी केली आणि त्यातून धक्कादायक माहिती त्यांच्या हाती लागली. एकाच नावाचे अनेक मतदार असल्याचे समोर आले. मतदान कार्ड क्रमांकापासून हा घोळ असल्याचे त्यांच्या लक्षात आले. एकाच घरात शेकडो मतदारांची नावे. वास्तविक त्या घरात मतदार यादीतील कोणीच राहात नसल्याची त्यांच्या तपासात समोर आले. म्हणजे डुप्लिकेट मतदारांचा मोठ्या प्रमाणात समावेश करण्यात आला आहे. एकाच मतदाराचे नाव कर्नाटकात दोन ठिकाणी आणि उत्तर प्रदेशातील लखनऊ किंवा महाराष्ट्रातही मतदारांच्या यादीत आढळले. त्यांनी आदित्य श्रीवास्तव आणि शकुन राणी या मतदारांचे उदाहरण दिले होते.

मतदार यादीतून मतदारांची नावे वगळण्याचा एक पूर्वनियोजित कार्यक्रम सुरू असल्याचा आरोप राहुल गांधींनी केला. काँग्रेस समर्थक असलेल्या मतदारांची नावे ऑटोमेटेड सॉफ्टवेअर वापरून पद्धतशीरपणे वगळण्यात आली. विशेषतः ज्या मतदान केंद्रांवर काँग्रेसचे प्राबल्य आहे, तेथील नावे हटवण्यात आली. हाच आरोप परवा महाराष्ट्रातील सर्वपक्षीय शिष्टमंडळाने राज्य निवडणूक आयुक्त आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या भेटीत केला. त्यांनी थेट देवांग दवे ही व्यक्ती मतदार यादीत नाव समाविष्ट करणे आणि वगळण्याचे काम करते असा आरोप केला.

राहुल गांधींचा आरोप आहे की, मतदारांची नावे वगळण्यासाठी ह्यफॉर्म 6ह्न वापरला गेला. मात्र, अर्ज करताना वापरलेले मोबाईल क्रमांक कर्नाटकातील नसून, तामिळनाडू किंवा झारखंडसारख्या परराज्यातील होते. महाराष्ट्रातील नेत्यांनी मात्र महाराष्ट्रात बसलेली व्यक्तीच हे काम करते असा आरोप केला आहे. एकूणच मतदार याद्यांवरील संशय वाढत चालला आहे. आधी एकट्या राहुल गांधी यांनी हे आरोप केले आता महाराष्ट्रातील प्रमुख विरोधी पक्ष ठाकरेंची शिवसेना, काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे आणि भाजपेतर अनेक पक्ष करत आहेत.

राहुल गांधींनी यानंतर हायड्रोजन बॉम्ब फोडणार असा दावा केला आहे. निवडणूक आयोगालाच त्यांनी लक्ष केले आहे. त्यांच्या जोडीला आता महाराष्ट्रातील त्यांचे सहयोगी पक्ष आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना आली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका मतदार याद्या सुधारल्याशिवाय घेऊ नका, असा पवित्रा या शिष्टमंडळाने दोन दिवसांच्या सलग भेटीनंतर घेतला आहे. कारण स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी वापरल्या जाणाऱ्या मतदार याद्या या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्याच वापरल्या जाणार आहेत.

या मतदार याद्या दोषपूर्ण आहेत, असे विरोधकांचे एकमत आहे. आठ वेळा निवडून आलेले बाळासाहेब थोरात कसे काय पडू शकतात, असा सवाल राज ठाकरेंनी केला. विधानसभेत महायुतीला २३२ जागा मिळाल्या आहेत. एवढा मोठा विजय मिळाल्यानंतरही सत्ताधाऱ्यांमध्ये उत्साह आणि जल्लोष दिसलेला नाही, त्याचे कारण हा विजय त्यांच्याही पचनी पडलेला नाही. जर जिंकलेले आणि पराभूत झालेले असे सर्वांनाच निवडणुकीबद्दल शंका असेल तर मग सुधारित मतदार याद्या झाल्याशिवाय निवडणुका घेऊ नका, असे विरोधकांनी एकमुखाने निवडणूक आयोगाला सांगितले आहे.

राज ठाकरे हे सातत्याने पक्ष नेते आणि कार्यकर्त्यांच्या बैठका घेत आहेत. यात त्यांनी 'भावी नगरसेवकांना' कोणत्या मतदार संघातून निवडणूक लढवणार तेथील मतदार याद्या तपासा, त्या बरोबर असतील तरच निवडणूक लढवा, असे स्पष्ट आदेश दिले आहेत. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरातांनी सांगितले परराज्यातून आणि बाहेर गावाहून शिकायला आलेले विद्यार्थी मतदार दाखवले जात आहेत. म्हणजेच दुबार मतदाराचा मुद्दा राहुल गांधी यांच्यानंतर राज्यातही उपस्थित केला जात आहे. राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत व्हीव्हीपॅट मशिन्स वापरणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

आधीच या निवडणूक प्रक्रियेवर ना राजकीय पक्षांचा ना जनतेचा विश्वास बसत आहे. त्यातल्या त्यात आपले मत कोणाला गेले हे सत्यापित करण्याची एकमेव परीक्षा असलेले व्हीव्हीपॅटही या निवडणुकीत वापरणार नसतील तर निवडणुकीतील घोळाचा कोणताच पुरावा शिल्लक ठेवायचा नाही म्हणून हे केले जात आहे का? हा प्रश्नही अवास्तव ठरत नाही. पारदर्शक आणि निष्पक्ष निवडणुका घेणे हेच आयोगाचे काम आहे. तेव्हा त्यांनी त्यासाठीची सर्व यंत्रणा अधिकाधिक वापरलीच पाहिजे. गेल्या चार-पाच वर्षांपासून राज्यात मुंबई महापालिकेसह २९ महापालिकेच्या निवडणुका कमी अधिक काळाच्या फरकाने रखडलेल्या आहेत. आता जेव्हा कोर्टाच्या सर्वोच्च आदेशाने त्या घेतल्या जाणार आहेत तेव्हा त्या पारदर्शक झाल्या पाहिजे, या राजकीय पक्षांच्या मागणीत आक्षेप असण्याचे कोणालाही कारण नाही. लोकशाहीच्या शुद्धीकरणासाठी हे आवश्यकच आहे.

सध्या विरोधी पक्षाने सुरू केलेली निवडणूक शुद्धिकरणाची मोहीम प्रथमच होत आहे असेही नाही. मतपत्रिकांवर निवडणूक होत होती तेव्हा सर्व धुतल्या तांदळासारखं होतं असं मानण्याचंही काही कारण नाही. तेव्हाही दुबार मतदार होते. मात्र त्यांचा आतासारखा मास व्होटिंगसाठी वापर झाल्याचे कधी समोर आले नाही. बुथ कॅप्चरिंगसारखे प्रकार बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश या हिंदीपट्ट्यात होत होते. मतदानातील या गैरप्रकारांना रोखण्यासाठी आणि वेगवान मतदान, मतमोजणी प्रक्रियेसाठी १९९० च्या दशकात तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या काळात ईव्हीएमचा प्रायोगिक तत्वावर वापर करण्यात आला. ईव्हीएमवर सुरुवातीपासून शंका उपस्थित केल्या जातात.

संपूर्ण देशात ईव्हीएमचा वापर करून आलेले पहिले सरकार भाजपचेच होते. २००४ मध्ये अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान झाले होते. मात्र भाजपचेच लालकृष्ण अडवाणी, सुब्रम्हण्यम स्वामी, किरीट सोमय्या यांनी कशा प्रकारे ईव्हीएम हॅक होतात हे सांगत होते. त्याचे डेमोदेखील दिले होते. २०१४ ला विश्वजीत कदम यांनी पुण्यातून निवडणूक लढवली तेव्हा देवेंद्र फडणवीसांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन एक लाख मतदार सांगलीहून आणल्याचे पुरावे देत होते. त्यामुळे आता मतदार याद्यांचे शुद्धीकरण, सुधारित मतदार याद्या करून निवडणूक घेण्याची संधी फडणवीसांच्याच सरकारच्या काळात चालून आली आहे. सध्या असलेल्या सदोष मतदार याद्यांवर विरोधी पक्ष निवडणुका लढवतील का, असा एक प्रश्न सध्या उपस्थित होत आहे. त्याबद्दल अजून विरोधी पक्षांनी भूमिका स्पष्ट केलेली नाही.

आता आणखी एक कळीचा प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे निवडणूक आयोगासमोर महाविकास आघाडी आणि मनसे एकत्र गेले. आता ते राहुल गांधींप्रमाणे जनतेमध्ये हा मुद्दा घेऊन जाणार का? कारण राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर थेट हल्लाबोल सुरू केला आहे. त्यामुळे या पक्षांनी आता एक-दोन दिवसांचा इव्हेंट करून चालणार नाही. त्यांना दाखवून द्यावे लागणार आहे की आम्ही या मुद्द्यावरच निवडणूक लढवणार आहोत. एक प्रकारे विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांविरोधात व्होटचोरीचं नॅरेटिव्ह सेट केले जात आहे. याचा फायदा त्यांना आगामी निवडणुकीत इतर पक्षांना सोबत घेण्यासाठी होऊ शकतो.

राज ठाकरे यांची आणि त्यांच्या पक्षाची वैचारिकता ही काँग्रेससोबतच्या जवळीकीची नाही. त्यांचा महाविकास आघाडीत प्रवेश झाला तर राज ठाकरे यांच्यासोबत काँग्रेसलाही अनेक प्रश्नांना उत्तरे द्यावी लागू शकतात. राज ठाकरे यांनी मराठी भाषा, मशिदीवरील भोंगे आणि सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे उत्तर भारतीयांना विरोध यांचा त्यांनी त्याग केला का, असे मनसेला विचारले जाऊ शकते. तर हेच मुद्दे उत्तर भारतात काँग्रेसला अडचणीचे होऊ शकतात. मात्र व्होटचोरीचं नॅरेटिव्ह पुढे करून चारही पक्ष एकत्र आले तर हे भावनिक मुद्दे बाजूला पडून वैचारिक तडजोड मानली जाईल. राजकारणाच्या शुद्धिकरणासाठी आम्ही एकत्र आलो असे सांगता येईल. फक्त भाजपला विरोध या एका मुद्द्यावर एकत्र येणे तेवढं फायदेशीर होऊ शकत नाही, तर लोकशाही वाचवण्यासाठी आम्ही एकत्र आलो, हा सर्व स्थरातील आणि जातीधमार्तील मतदारांपर्यंत पोहोचणारा मुद्दा आहे.

मुंबई महापालिकेची निवडणूक भाजपला धर्माच्या आधारावर लढायची आहे, असे दिसते. अमित साटम भाजपचे मुंबई अध्यक्ष झाल्याबरोबर त्यांनी शिवसेना जिंकली तर खान महापौर होईल, असे नॅरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे जैन, मारवाडी, गुजरातीविरुद्ध मराठी हाही मुद्दा कधी गुप्त तर कधी उघडपणे समोर आणला जात आहे. त्यासाठीच भाजपच्या कबुतरांची फडफड सुरू आहे. धमार्चा मुद्दा फक्त मुंबई महापालिकेपुरताच नाही, तर महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतही हाच मुद्दा भाजप आणण्याच्या तयारीत आहे. देवेंद्र फडणवीसांनी एका भाषणात म्हटले होते की, ८५ टक्के मराठा समाज हिंदुत्ववादी आहे. विधानसभेत 'बटेंगे तो कटेंगे' हा मुद्दा भाजपसाठी फायद्याचा ठरलाच होता. याचे छोटे-छोटे प्रयोग पडळकर, राणे आणि संग्राम जगताप ठिकठिकाणी करताना दिसत आहेत. ओबीसीविरुद्ध मराठा या मुद्दयावर ही निवडणूक भाजपला न्यायची नाही. त्यामुळेच धर्माच्या मुद्द्यावर निवडणूक नेण्याचे त्यांचे प्रयत्न राहाणार आहेत.

विरोधी पक्षांना हिंदुत्वावर निवडणूक घेऊन जायची नसेल तर व्होटचोरीचा मुद्दा हा महाविकास आघाडीला आणि त्यांचा नवा भिडू राज ठाकरे यांच्याही फायद्याचा ठरू शकतो. मुंबईतील दलित आणि मुस्लीम मतं ही उद्धव ठाकरे यांच्याकडे आकर्षित झालेली आहेच. ती राज ठाकरे यांच्या एन्ट्रीमुळे दुरावली जाऊ नये यासाठी एका तटस्थ मुद्द्याची त्यांना गरज आहे. लोकशाही वाचवण्याचा मुद्दा सर्व जाती धमार्तील लोकांना एकत्रित आणणारा आहे. आता भाजपेतर पक्ष तो किती नेटाने पुढे नेतात, यावरच सर्वकाही अवलंबून आहे.

# एक दिवसाच्या फराळाने आदिवासांचे काय होणार?

**अलीकडे आदिवासी पाड्यांवर जाऊन दिवाळी साजरी करण्याचे प्रकार वाढले आहेत. आपल्या आनंदात गरजूंनाही सहभागी करून घेण्यामागील उद्देश चांगलाच असल्याने त्याविषयी शंका घेण्याचे कारण नाही, मात्र हा आनंद एकाच दिवसापुरता मर्यादित नसावा, मुंबईपासून जवळच असलेल्या ठाणे, पालघर भागातील काही आदिवासी गावपाड्यांपर्यंत अद्याप वीज पोहचलेली नाही, या गावपाड्यांमध्ये आजच्या अत्याधुनिक इंटरनेटच्या जगातही अंधार कायम असतो.**



अनेक आदिवासी पाडे असेही आहेत, ज्या ठिकाणी आरोग्याच्या कुठल्याही सुविधा नाहीत, या गावापाड्यात जरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना मंजुरी मिळालेली आहे तरी आरोग्य कर्मचारी जसे की आरोग्य अधिकारी, डॉक्टर किंवा इतर कर्मचारी अशा दुर्गम भागात राहायला नकार देतात, त्यामुळे येथील सरकारी दवाखान्यांची स्थिती बिकट असते. आदिवासी भागात वीजच नसल्याने इंटरनेटचा विषयच नसतो, परिणामी येथील विद्यार्थी बाहेरच्या जगाशी तुटलेलेच असतात. पावसाळ्यात डोंगररस्त्यांवर दरड कोसळण्याची भीती असते तर दगडमातीचा रस्ता चिखलाने भरल्याने जोरदार पावसात गावांचा संपर्क तुटतो, त्यामुळे विद्यार्थ्यांची शाळा बुडते.

भिवंडीतील ग्रुप ग्राम पंचायत खंबाळा हद्दीतील खंबाळा, कुशीवली, पाली, किरवली, राऊतपाडा या आदिवासी पाड्यात रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने पिण्याच्या पाण्याची वाहिनी तोडून टाकली, हे पाणी आदिवासींना पोहचवले जात होते. याबाबत कंत्राटदारावर कारवाई करण्याचे लेखी निवेदन ग्रामपंचायत प्रशासनाने पडघा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना दिले. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुका आदिवासी बहुल आहे. येथील कित्येक आदिवासी वाडी, पाड्यांना जोडणारे पक्के रस्ते नाहीत, त्यामुळे रुग्णांना आजही बांबूला झोळी बांधून उचलून न्यावे लागते, रस्ताच नसल्याने रुग्णवाहिका पाड्यापर्यंत पोहचत नाही, इतर सार्वजनिक वाहतूकही गावपाड्यांपर्यंत पोहचत नाही.

राज्य मानव अधिकार आयोगाने या घटनेची 'स्यू मोटो' दखल घेऊन कार्यवाही सुरू केली आहे. प्रश्न हा आहे की वर्तमानपत्रातील बातम्या वाचून संबंधित आयोगाला स्वतःहून दखल घ्यावी लागते, येथील लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि सरकारी यंत्रणा आदिवासी गावपाड्यांपर्यंत स्वातंत्र्याची ७० वर्षे झाली तरी अद्याप का पोहचू शकल्या नाहीत? आदिवासी समुह हा विशेष करून भाजीपाला, किरकोळ शेती, भातपीक, पशूपालनावर गुजराण करतो. इतर वेळेस छोट्यामोठ्या कामाच्या ठिकाणी वीटभट्टी, रोजगार हमी, बांधकामांवर मजूर म्हणून जातो.

यंदा अतीवृष्टीमुळे आदिवासींच्या किरकोळ शेती उत्पादनाचा विषय निकालात निघाला आहे. आदिवासीबहुल भागात भात, नागली, वरई, उडीद आदी पिकांचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे. आदिवासींना राज्याच्या संस्कृती कलेचे रक्षक म्हणून त्यांचा मोठमोठ्या महोत्सवात गौरव केला जातो. वारली चित्रकला, तारपा नृत्याचे सोहळे भरवले जातात. मात्र राष्ट्रपती शौर्य पुरस्कार मिळवलेल्या हाली बरफला किरकोळ रोजगारासाठी संघर्ष करावा लागतो. आदिवासींचा मूलभूत प्रश्न हा शिक्षणाचा असून त्यादृष्टीने धोरणात्मक ठोस उपाययोजना करण्यात सरकारला अपयश आले आहे. शिक्षणच नसल्याने संधी नाहीत, संधी नसल्याने प्रगतीच्या मुख्य प्रवाहापासून आदिवासी दूर फेकला गेला आहे.

शहापुरात ५० हजार रुपयांत अल्पवयीन कातकरी मुलीची लग्नाच्या नावावर विक्री करण्याचा प्रयत्न काही महिन्यांपूर्वी श्रमजीवी संघटनेने उधळून लावला होता. यात नवरदेवासह वर आणि वधू पक्षातील चौघांना अटक झाली होती. मुलीच्या घरातील गरीब परिस्थितीचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न यात स्पष्टपणे समोर आला. आदिवासांमधील कमालीचे दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव आणि कुपोषण, आजारपण, सर्पदंशाने होणारे मृत्यू हे गंभीर प्रश्न ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील आदिवासींसमोर आहेत. शहापूर तालुक्यातीलच आवळे या दुर्गम आदिवासी भागात मागील वर्षभरापासून सरपंचपद रिक्त असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या ग्रामपंचायतीमध्ये ५ महसुली गावे तसेच १८ आदिवासी गावपाडे असतानादेखील या ठिकाणी ४ गावपाड्यांना पोलीस पाटील नसल्याने येथे कायदा आणि सुव्यवस्थेचा बोंया वाजल्याचेही समोर आले होते. विद्यार्थ्यांचे महसुली दाखले आणि आरोग्याचे प्रश्नही कायम होते. तर ग्रामपंचायत पिवळी हद्दीतील हेदूचापाडा वाडीत तीन पिढ्यांपासून अंधारात जीवन जगणाऱ्या सुमारे वीस घरांच्या शंभर ग्रामस्थांना २९ सप्टेंबर रोजी विजेचा दिवा लागला. महावितरण, आदिवासी विकास प्रकल्प आणि वनविभागाने यात मोलाची कामगिरी बजावली. आदिवासी पाड्यांमध्ये अद्यापही आरोग्य, शिक्षण, रस्ते, वीज, पिण्याचे पाणी, गावठाण, स्मशानभूमी यांसारख्या मूलभूत सुविधा मिळालेल्या नाहीत.

आदिवासी पाड्यांभोवती टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या त्यांना पाणी, वीज अशा सुविधा मिळाल्या मात्र ज्या आदिवासींच्या जागेवर हा 'विकास' झालेला आहे, त्या आदिवासींच्या नशिबी मात्र अंधारच आहे. अनेक आदिवासींना रेशनकार्ड नाही, त्यामुळे आधार, पॅन कार्डही नाही. धनदांडग्यांकडून आदिवासी मजुरांना मारहाणीचे प्रकारही अनेकदा घडले आहेत. आदिवासी पाड्यांवर दिवाळीनिमित्त केवळ एकदोन दिवस फराळ, फटाके, कपडे वाटप करून हे प्रश्न सुटणारे नाहीत, त्यासाठी ठोस कृतीकार्यक्रम, धोरणात्मक अंमलबजावणीची गरज आहे. त्यासाठी सर्वसमावेशक प्रयत्न सातत्याने व्हायला हवेत, तरच आदिवासींच्या घरातही खऱ्या अर्थाने प्रगतीचा प्रकाश पोहोचेल. कारण या एक दिवसाच्या दिवाळी फराळाने त्यांच्या जीवनात फरक पडणार नाही.

# बलिप्रतिपदा म्हणजे काय? जाणून घ्या या दिवसाची आख्यायिका आणि मुहूर्त

लक्ष्मीपूजनानंतर साजरा केला जाणारा महत्त्वाचा सण म्हणजे बलिप्रतिपदा, ज्याला दिवाळी पाडवा म्हणूनही ओळखले जाते. हा दिवस केवळ उत्सव आणि आनंदाचा नाही, तर त्यामागे अनेक पौराणिक आख्यायिका आणि परंपरा दडलेल्या आहेत. या सणाची कथा आणि पारंपरिक मान्यता ही त्याला आणखी अर्थपूर्ण बनवते. चला तर मग जाणून घेऊ या वर्षी बलिप्रतिपदा कोणत्या मुहूर्तावर येते, ती कशी साजरी केली जाते आणि त्यामागची परंपरा काय आहे...

अश्विन महिन्यातील अमावस्येनंतर लक्ष्मीपूजन झाल्यावर कार्तिक शुद्ध प्रतिपदेला बलिप्रतिपदा साजरी केली जाते, जी दिवाळी पाडवा म्हणून ओळखली जाते. हा दिवस फक्त उत्सवासाठी नाही, तर त्याचे अनेक धार्मिक आणि सामाजिक महत्त्वही आहे. सोने खरेदी, सुवासिनींकडून पतीचे औक्षण, व्यापाऱ्यांसाठी वर्षाचा प्रारंभ यांसारख्या गोष्टींसाठी हा दिवस खास मानला जातो. पाडव्याच्या दिवशी पंचरंगी रांगोळीने बळीची प्रतिमा काढून तिची पूजा केली जाते आणि ‘इडा, पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो’ अशी प्रार्थना केली जाते. बलिप्रतिपदा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक अतिशय शुभ मानला जाणारा दिवस आहे. या वर्षी, २२ ऑक्टोबर २०२५ रोजी, बलिप्रतिपदा साजरी होणार आहे.

बलिप्रतिपदा साजरी करण्यासाठी या वर्षी तीन शुभ मुहूर्त आहेत:

- पहिला शुभ मुहूर्त: सकाळी सूर्योदयापासून ते सकाळी ९:३० वाजेपर्यंत
- दुसरा शुभ मुहूर्त: सकाळी १०:५६ वाजल्यापासून ते दुपारी १२:२३ वाजेपर्यंत
- तिसरा शुभ मुहूर्त: संध्याकाळी ४:२४ वाजल्यापासून ते ६:०९ वाजेपर्यंत

# बळी प्रतिपदेची पौराणिक कथा

ही गोष्ट आहे राजा विरोचन पुत्र असुर राजा बळीची. राजा बळी अत्यंत दानशूर होता. खरं तर भक्त प्रल्हाद यांचा नातू म्हणून देखील त्यांची ओळख होती. राक्षस कुळात जन्म घेऊन सुद्धा चारित्र्यवान, विनयशील, प्रजेचा हितचिंतक अश्या रूपाने ते प्रख्यात असे. त्यांच्या दारी जो मागण्यासाठी यायचा त्याला राजा बळी रिते हस्ते पाठवत नसे. त्यांच्याकडे अफाट संपत्ती होती. देवांचा त्यांनी आपल्या बळाच्या सामर्थ्यावर अनेकदा पराभव केला होता म्हणून तो त्रैलोक्य विजेता असे. त्याला त्याचा फार गर्व झाला होता. त्यांना आणि त्यांचा गर्वहरण करण्यासाठी भगवान श्री हरी विष्णू यांची निवड करण्यात आली. एकदा राजा बळीने यज्ञ करण्याचे ठरविले. त्यांचा नियम असे की यज्ञ झाल्यावर तो नेहमीच दान देत असे. भगवान विष्णू वामन अवतार घेऊन त्याचा दारी मागण्यासाठी येतात. त्यावर बळी त्यांना ब्राह्मण कुमार आपणास काय हवे असे विचारतात. त्यावर वामन अवतारी विष्णू त्यांना त्रिपाद भूमिदान द्या असे म्हणतात. राजा बळी त्यांना त्रिपाद भूमी देण्यास होकार देतात. त्यांना असे वाटते की हे तर वामन आहेत यांचा त्रिपाद भूमी मध्ये काय येणार. तेवढ्यातच वामन अवतारी विष्णूंनी आपले रूप विराट करून एका पावलात सर्व पृथ्वी व्यापिली, दुसऱ्या पावलात सर्व पाताळ, ब्रह्माण्ड व्यापले आता त्यांच्या दोन पावलातच राजा बळी सर्व गमावून बसल्यामुळे त्याकडे देण्यासारखे काहीच नव्हते. आता तिसरा पाय कुठे ठेवू असे ब्राह्मण कुमाराने विचारल्यावर राजा बळी विचारात पडतात आणि मग काही वेळा विचार करून त्यांना म्हणतात की महाराज आपण आपले पाय माझ्या डोक्यावर ठेवा. असे म्हणतातच वामन आपले तिसरे पाऊल त्याचा डोक्यावर ठेवतातच बळी पाताळात सामावतात. तेव्हा श्री विष्णू त्यांना पाताळाचे राज्य देतात आणि वर मागण्यास सांगतात. त्यावर बळीने उत्तर दिले की देवा आता पृथ्वीवर माझे राज्य संपणारच आहे माझी इच्छा आहे की पृथ्वीवर दरवर्षी तीन दिवस तरी माझे राज्य म्हणून ओळखावे. यमासाठी दीपदान करणाऱ्यांना कधीही यमाचा त्रास होऊ नये. त्याकडे लक्ष्मीचा नेहमी वास असावा. ते 3 दिवस आश्विन मासातील कृष्णपक्षाची चतुर्दशी, आश्विन अमावस्या आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा. याला बळी प्रतिपदा किंवा बळीराज्य असे ही म्हणतात. त्या दिवसापासून बळी प्रतिपदा करण्याची प्रथा सुरू झाली. पाडवा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त आहे. या दिवशी व्यापारी वर्ग नवं वर्षाची सुरुवात मानतात. बळी राजाचे रांगोळीने चित्र काढतात आणि नव्या कामाला सुरुवात करतात.



# बाळाची पहिली दिवाळी या पद्धतीने बनवा खास

पहिला दिवस म्हणजे ‘नरक चतुर्दशी’. अश्विन कृष्ण चतुर्दशीला ‘नरक चतुर्दशी’ असे म्हणतात. या दिवशी दिवाळीची पहिली आंघोळ म्हणजे अभ्यंग स्नान केले जाते. अभ्यंगस्नानापासून सुरु झालेली दिवाळी लहान थोरांपासून सर्वच जण आनंदात साजरी करतात. त्यात जर घरात लहान मुलं असेल आणि त्याची पहिली दिवाळी असेल तर विचारूच नका.. आई-वडील विविध पद्धतीने बाळाची पहिली दिवाळी खास करण्याचा प्रयत्न करतात. तुमच्याही बाळाची पहिली दिवाळी असेल तर मग बाळाची पहिली दिवाळी खास करण्यासाठी अभ्यंगस्नान ते कपड्यांपर्यंत सर्व गोष्टींमध्ये काय खास करता येईल, ते पाहूयात.

- **उटणे :** आयुवेर्दानुसार बाळासाठी घरी खास उटणे तयार करू शकता. यासाठी खोबरेल तेल, दुध, मैदा, बेसन, मलई, मध, हळद, मोहरी तेल या पदार्थांचे मिश्रण तयार करून उटणे बनवता येईल. घरातील या नैसर्गिक पदार्थांमुळे बाळाला कोणत्याही प्रकारची ॲलर्जी होणार नाही.

**कसे बनवाल?**

- उटणे बनवण्यासाठी सर्व कोरड्या गोष्टी मिक्स करून घ्याव्यात. नंतर त्यात मध आणि थोडं थोडं करून दूध घाला. मिश्रण खूप जास्त पातळ बनवायचे नाही. सर्वात शेवटी साय आणि मोहरी घाला. अशा पद्धतीने तयार झाले आहे तुमचे उटणे.

- **पहिली अंघोळ :** बाळाची पहिली अंघोळ म्हणजे अभ्यंगस्नान असेल. बाळाची पहिली दिवाळी असली तरी त्याची झोप पूर्ण झाल्याशिवाय त्याला उठवू नका. बाळ उठल्यावर त्याला पहिलं चांगल मालिश करून घ्यावी. नंतर हाताने अगदी थोडं उटणे लावावे.

- **आरामदायी कपडे घाला :** दिवाळी आणि नवीन कपडे हे जणू समीकरण आहे. उत्साहाच्या भरात आपण लहान मुलांनाही भरजरी कपडे घेतो. ज्याच्या बाळाला त्रास होऊ शकतो. त्यामुळे पहिली दिवाळी असली तरी बाळासाठी आरामदायी कपडे निवडावेत.

**हे महत्त्वाचे**

- बाळासाठी त्याचे रुटीन, त्याची माणसं महत्त्वाची असतात. अशावेळी तुम्ही नवीन लोकांमध्ये किंवा गर्दीच्या ठिकाणी मुलांना घेऊन जाणे टाळायला हवे.
- लहान बाळांना स्पर्श करणे, धरून ठेवणे, हसणे आणि हसणे आवडते पण हे त्याच्या ओळखीच्या चेहऱ्यासमोर होत असेल तर ते त्याच्यासाठी योग्यच आहे. अनोळखी व्यक्तींकडे बाळाला देऊ नये.

# दिवाळी पाडवा २०२५ तारीख महत्व आणि साजरा करण्याची पद्धत

- गोवर्धन आणि अन्नकुट पूजेचा शुभ मुहूर्त २२ ऑक्टोबर २०२५
- प्रतिपदा तिथी सुरू होते - २१ ऑक्टोबर २०२५, संध्याकाळी ५:५४ वाजता.
- प्रतिपदा तिथी संपेल - २२ ऑक्टोबर २०२५, रात्री ८:१६ वाजता.

**टीप :** उदयतिथीनुसार गोवर्धन आणि अन्नकुट पूजा २२ ऑक्टोबर २०२५ रोजी होणार आहे.

- गोवर्धन पूजा सकाळी शुभ वेळ ६:२६ ते ८:४२ दरम्यान.
- गोवर्धन पूजा संध्याकाळची शुभ वेळ -दुपारी ३:२९ ते संध्याकाळी ५:४४ दरम्यान.
- गोवर्धन पूजा संधिप्रकाश शुभ वेळ - संध्याकाळी ५:४४ ते संध्याकाळी ६:१० दरम्यान.

गोवर्धन पूजा सहसा दिवाळीच्या आदल्या दिवशी येते आणि भगवान श्रीकृष्णाने भगवान इंद्रावर केलेल्या पराभवाचे स्मरण करते.

कधीकधी, दिवाळी आणि गोवर्धन पूजा यांच्यामध्ये एक दिवसाचे अंतर असू शकते. धार्मिक ग्रंथ कार्तिक महिन्यातील प्रतिपदा तिथीला गोवर्धन पूजा साजरी करण्याची शिफारस करतात. हिंदू कॅलेंडरमध्ये, प्रतिपदा तिथीच्या सुरुवातीच्या वेळेनुसार, गोवर्धन पूजा अमावस्या तिथीच्या एक दिवस आधी देखील येऊ शकते. गोवर्धन पूजा अन्नकूट पूजा म्हणून देखील ओळखली जाते. या दिवशी गहू आणि तांदूळ, बेसनापासून बनवलेली कढी आणि पालेभाज्यांपासून बनवलेले अन्न शिजवले जाते आणि भगवान श्रीकृष्णाला अर्पण केले जाते. महाराष्ट्रात, हा दिवस बली प्रतिपदा किंवा बली पाडवा म्हणून साजरा केला जातो. भगवान विष्णूचा अवतार असलेल्या वामनाचे या दिवशी राजा बलीवर विजय आणि त्यानंतर पाताळात हद्दपार झाल्याबद्दल स्मरण केले जाते. असे मानले जाते की भगवान वामनाने दिलेल्या वरदानामुळे, राक्षस राजा बली या दिवशी पाताल लोकातून पृथ्वीवर आला. बहुतेकदा, गोवर्धन पूजा दिवस गुजराती नववषासीबत येतो, जो कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षात साजरा केला जातो. प्रतिपदा तिथीच्या सुरुवातीच्या वेळेनुसार, गोवर्धन पूजा उत्सव गुजराती नववर्षाच्या एक दिवस आधी साजरा केला जाऊ शकतो.

# यंदाचा पाडवा करा खास जोडीने व्हा तयार

दिवाळी पाडवा म्हणजे नवरा-बायकोच्या नात्याच्यादृष्टीने अतिशय महत्त्वाचा दिवस असतो. पाडव्याला पत्नी पतीस अभ्यंगस्नान घालते आणि त्याचे औक्षण करते. पतीला उदंड आयुष्य लाभावे यासाठी देवाकडे प्रार्थना करते. नवरा आपल्या घरातील लक्ष्मीला आजच्या दिवशी भेटवस्तू देतो. यंदाचा पाडवा स्पेशल होण्यासाठी तुम्ही एकत्र तयार छान तयार होऊ शकता. यामुळे तुमचा लूक खूप छान दिसेल. दिवाळी पाडव्याला नवरा-बायको फॅशनसाठी खास कपड्यांची निवड करू शकतात. यामध्ये पारंपरिक आणि आधुनिक फॅशनचा मिलाफ साधता येईल. पाहूयात यांसदभार्तील काही टिप्स

- **पारंपरिक लूक :** तुम्हाला पारंपरिक लूक करायचा असेल तर पैठणी किंवा भरजरी साडी उत्तम राहील. यासोबत पतीला रेशमी कुर्ता-पायजमा ट्राय करता येईल.

- **वेस्टर्न लूक :** वेस्टर्न कपड्यांमध्ये डिझायनर गाऊन किंवा इंडो-वेस्टर्न ड्रेस ट्राय करता येईल. तर पुरुषांनी बायकोला ट्विनिंग करण्यासाठी फॅशनेबल जॅकेट किंवा स्टायलिश शर्टसोबत फॉर्मल पॅन्ट ट्राय करावी.

- **ॲक्सेसरीज :** पारंपरिक लूकवर पारंपरिक दागिने साडीवर घालता येतात. मोत्याचे दागिने, सोन्याचे दागिने घालता येतील. तर कुर्ता पायजम्यावर साखळीचे घड्याळ घालता येतील त्यासोबत कोल्हापूरी चप्पल घालायला विसरू नका. तुम्ही वेस्टर्न आऊटफिट घालणार असाल तर हिऱ्यांचे पेडेंट घालता येईल. वेस्टर्न गाऊनवर हिल्स तर पुरुष चप्पल घालू शकतात.



# दिवाळी साजरी करून गाढ झोपले... अचानक इमारतीला लागली आग, ६ जणांचा मृत्यू

## कामोठे मध्ये भीषण आगीत आई-मुलीचा मृत्यू



नवी मुंबईत आगीची आणखी एक दुर्घटना घडली असून कामोठे येथील आगीत आई-मुलीने जीव गमावला. नवी मुंबईतील कामोठे सेक्टर ३६ मधील आंबे श्रद्धा सहकारी गृहनिर्माण सोसायटीमध्ये सोमवारी रात्री अचानक लागलेल्या आगीत भीषण दुर्घटना घडली. दुसऱ्या मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये लागलेल्या या आगीत दोन जणांचा मृत्यू झाला असून मृतांमध्ये आई आणि मुलगी यांचा समावेश आहे. आग लागल्याची माहिती मिळताच नवी मुंबई अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले. सोसायटीतील सर्व रहिवाशांना तात्काळ सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार, आग लागली तेव्हा घरात पाच जण उपस्थित होते. यापैकी तिघांनी वेळेवर बाहेर पळ काढल्याने त्यांचे प्राण वाचले, परंतु आई आणि मुलगी घरातच अडकल्या, ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही, मात्र प्राथमिक अंदाजानुसार शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे. पोलीस आणि अग्निशमन विभाग या घटनेचा पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे कामोठे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

दिवाळीच्या दिवशीच नवी मुंबईतून एक दुःखद बातमी समोर आली आहे. वाशीतील एका बहुमजली इमारतीमध्ये भीषण आग लागून अनेकांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेत सहा वर्षांच्या चिमुकल्या मुलीसह ४ जण मृत्यूमुखी पडले तर १० जण जखमी झाले. तर कामोठे येथे लागलेल्या आगीत आई-मुलीने जीव गमावला. एकाच दिवशी ६ जणांचा मृत्यू झाल्यामुळे एकच हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वाशी सेक्टर-१४ मधील रहेजा रेसिडेन्सी हाऊसिंग सोसायटीमध्ये पहाटे १ वाजण्याच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली. दिवाळीनिमित्त मजा करून, सण साजरा करून इमारतीतील सर्व रहिवासी झोपायला गेले होते. तेव्हाच इमारतीच्या



१० व्या मजल्यावर आग लागली आणि बघता बघता ती ११ व्या आणि १२ व्या मजल्यापर्यंत पसरली. आगीच्या ज्वाळा आणि धुराने संपूर्ण इमारत वेढली गेली. त्यामध्ये एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला तसेच एका ८० वर्षांच्या वृद्धेनेही जीव गमावला.

६ वर्षीय वेदिका नायर, तिचे आई वडील यांचा मृत्यू झाला. ते १२ व्या मजल्यावर रहात होते, आग लागल्यावर धुरामुळे ते बाहेर पडले नाहीत आणि काळाने त्यांच्यावर घाला घातला. तर १० व्या मजल्यावरील एका ४०वर्षाच्या महिलेचाही या दुर्दैवी घटनेत मृत्यू झाला.

आग लागताच गोंधळ, अनेक जण बाल्कनीत अडकले

आगीचे वृत्त मिळताच अग्निशमन दलाच्या १० गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि त्यांनी तातडीने आग विझवण्याचे प्रयत्न सुरू केले. बचाव आणि मदत कार्यादरम्यान, अनेक लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले, तर काहींना धुरामुळे श्वास घेण्यास त्रास होत होता आणि त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. आगीत चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मात्र आग लागल्याचे समजताच बिल्डींगमध्ये प्रचंड गोंधळ माजला. अनेक लोक बाल्कनीमध्ये अडकले होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी शिड्या आणि हायड्रोलिक लिफ्टच्या मदतीने त्यांना बाहेर काढलं. प्राथमिक तपासात ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचे समोर येत आहे, मात्र अग्निशमन विभागाकडून तपास सुरू आहे.

## मच्छिमार नगर परिसरात अग्नितांडव... १५ वर्षीय मुलाचा मृत्यू, तिघे गंभीर जखमी

**■मुंबई। प्रतिनिधी,**

कफ परेड येथील मच्छिमार नगर परिसरात सोमवारी पहाटे चारच्या सुमारास एका चाळीत भीषण आग लागली. या दुर्घटनेत एका १५ वर्षीय मुलाचा होरपळून मृत्यू झाला, तर अन्य तिघे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने सेंट जॉर्ज रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक आहे. दरम्यान, या घटनेमुळे ऐन दिवाळी सणात परिसरात शोककळा पसरली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, कॅप्टन प्रकाश पेठे मार्ग, मच्छिमार नगर येथील एका चाळीच्या पहिल्या मजल्यावर ही आग लागली. आगीची तीव्रता अधिक असल्याने इलेक्ट्रिक वाहनांच्या



तीन बॅटरी, वीज जोडणी आणि घरातील वस्तूंनी पेट घेतला व आग पसरली. सुमारे १०७१० फुटांच्या जागेत आगीचे हे तांडव सुरू होते. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान, स्थानिक पोलीस आणि बेस्टचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले.

यावेळी आगीच्या विळख्यातून चार जणांना तातडीने बाहेर काढण्यात आले. आणि त्यांना उपचारासाठी सेंट जॉर्ज रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी १५ वर्षीय यश खोत या मुलाला डॉक्टरांनी तपासणीनंतर मृत घोषित केले. या दुर्घटनेत जखमी झालेल्यांमध्ये देवेंद्र चौधरी (३०) यांची प्रकृती चिंताजनक असून, त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. तर, विराज खोत (१३) आणि संग्राम कुर्णे (२५) या दोघांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही, मात्र प्राथमिक तपासानुसार इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरीमुळे आग भडकल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## नवी मुंबईकर... वाहनांच्या संख्येत वाढ झाल्याने नियोजन

**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात शुक्रवारपासून जागोजागी वाहतूककोंडी होत आहे. दिवाळी सुट्टी आणि होणारी वाहतूककोंडी पाहता वाहतूक पोलीस विभागाने उपाययोजना केल्या होत्या. त्यामुळे वाहतूककोंडी होणार नाही असा दावा करण्यात आला होता. मात्र दिवाळीच्या सलग सुट्ट्या, वाहन संख्येत झालेली अनपेक्षित वाढ, त्यात मुख्य मार्गावर होणारे लहान-मोठे अपघात आणि त्यात बेशिस्त वाहन चालकांमुळे वाहतुकीचे तीन तेरा वाजले होते. सोमवारपासून वाहतूककोंडीतून काहीसा दिलासा मिळाला असून मंगळवारी पुन्हा वाहतूककोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूक पोलीस, विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत.

वाहतूक पोलीस विभागाने वाहतूक कोंडीची ठिकाणी शोधून बंदोबस्त लावला होता. मात्र ठाणे-बेलापूर मार्ग, शीव-पनवेल महामार्ग, पाम बीच, रबाळे शिरवाने, एमआयडीसीच्या अंतर्गत मार्गावर वाहतूककोंडी



बाजार ठिकाणी वाहतूककोंडी रोखण्यात बऱ्यापैकी यश आले. मात्र ठाणे, नवी मुंबई आणि मुंबईकडून राज्याच्या अन्य भागात जाणाऱ्या गाड्यांच्या संख्येत अनपेक्षित वाढ, त्यात मॅपवर कमी वाहतूक दाखवल्याने मुंबईकडून पनवेलकडे जाणाऱ्या हलक्या वाहनांचा पाम बीच मार्गे वापर, छोटे अपघात, अनेक ठिकाणी गाड्या बंद पडणे अशा कारणांनी वाहतूककोंडी होत आहे. त्यावर तत्काळ उपाययोजना केल्या जातात.

- तिरुपती काकडे, पोलीस उपायुक्त, वाहतूक विभाग

### महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या मोर्चाची घोषणा!

## १ नोव्हेंबरला मुंबईच्या रस्त्यांवर दिसणार विराट मोर्चा

**■मुंबई। प्रतिनिधी,**

निवडणूक आयोगाच्या विरोधात राज्यातील विरोधकांनी आता एल्गार पुकारला आहे. विरोधकांनी निवडणूक आयोगाच्या विरोधात रस्त्यावर उतरण्याचा निर्धार केला आहे. राज्यातील विरोधक १ नोव्हेंबरला निवडणूक आरोगाच्या विरोधात मुंबईत विराट मोर्चा काढणार आहेत. या मोर्चात मविआसोबतच महाराष्ट्र नवनिर्माण सेनाही सहभागी होणार आहे. त्यामुळे मतदार यांद्यांमधील घोळासंदर्भात विरोधकांनी आता रस्तावरच्या लढाईला सुरूवात केली आहे. तर विरोधकांना पराभव समोर दिसत असल्याने रडीचा डाव सुरू केल्याची टीका महायुतीच्या नेत्यांनी केली आहे.

मतदार याद्यांमधील घोळ आणि



निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप घेत विरोधकांनी रान उठवलं आहे. निवडणूक आयोगाची भेट घेतल्यानंतर आता सर्वपक्षीय विरोधकांनी आयोगाविरोधातील मोचार्ची हाक दिली आहे. मविआसह मनसेनं निवडणूक आयोगाविरोधात एल्गार पुकारला आहे. निवडणूक आयोगानं मतदार याद्यांमधील चुका दुरुस्त कराव्यात असं आवाहन पुन्हा एकदा मविआसह मनसेनं केलं आहे. निवडणूक आयोगाविरोधात १ नोव्हेंबरला मुंबईत विराट मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती संजय राऊतांनी दिली आहे. तसंच निवडणूक आयोगाला दणका देणारचं असा इशाराही संजय राऊतांनी दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष या मोर्चात सहभागी होणार आहे. चोरीच्या वाटेनं मतदार घुसवल्याचा ज्यांना फायदा झाला ते कदाचित आमच्या मोर्चात सहभागी होणार नाहीत, असा टोला जयंत पाटलांनी लगावला. सर्वपक्षीय विरोधकांच्या मोर्चाला मनसेनं पाठिंबा दिलाय. तर लोकशाही वाचवण्यासाठी हा मोर्चा असल्याचं काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी म्हटलं आहे. तर बाळा नांदगावकर यांनी निवडणूक आयोगाच्या डोळ्यात अंजन घालण्यासाठी मोर्चा असल्याचं सांगितलं आहे.

तर विरोधकांचा हा मोर्चा म्हणजे रडीचा डाव असल्याची टीका भाजपचे मंत्री आशिष शेलार यांनी केली आहे. तर विरोधकांना पराभव आतापासूनच दिसत असल्याने विरोधकांनी असे आरोप करायला सुरूवात केल्याची टीका शिवसेना नेते आणि मंत्री शंभूराज देसाई यांनी केली आहे.

## सायबर गुन्हेगारांचे खबरी कोण?

### वैयक्तिक माहिती त्यांना मिळतेच कशी?

**■मुंबई। प्रतिनिधी,**

जेव्हा मुंबईत अंडरवर्ल्डची दहशत शिगेला होती आणि गोळीबार रोजच्याच घडत होता, तेव्हा कोणीतरी ज्याला मारायचे आहे, त्याची खबर टोळी प्रमुखाला देत असे. मुंबईतील ज्वेलर्समध्ये देखील दरोड्याच्या घटना घडायच्या, त्यावेळी दरोडेखोरांना ज्वेलर्सचे कर्मचारीच माहिती देत असल्याचे अनेकदा उघड झाले आहे. यानंतर आता, सायबर फसवणूकीच्या प्रकरणांमध्येही असेच घडत असल्याचे निदर्शनात येत आहे. मात्र अद्याप कोणताही खबरी पकडला गेलेला नाही.

काही दिवसांपूर्वी, मुंबईतील एका वृद्ध दाम्पत्याला डिजिटल पद्धतीने अरेस्ट करण्यात आली आणि सायबर स्कॅमिंग करून त्यांना ५८ कोटींचा गंडा घातला गेला. तपासात असे दिसून आले की, त्या वृद्ध व्यक्तीने अलीकडेच एका औषध कंपनीतील शेअर्स विकून ५० कोटी रुपये मिळवले होते. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना सायबर फसवणूक करणाऱ्यांकडून फोन येऊ लागले.



तीन दिवसांपूर्वी, एका माणसाच्या वडिलांना नवी दिल्लीतील एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर ऑपरेशन थिएटरमध्ये हृदय शस्त्रक्रिया सुरू होती. अशावेळी त्यांच्या मुलाला एम्स हार्ट सर्जरी विभाग असल्याचे भासवून एका अज्ञात क्रमांकावरून फोन आला. फोन करणाऱ्याने मुलाला सांगितले की, तुमच्या वडिलांना शस्त्रक्रियेदरम्यान संसर्ग झाल्याचे निदान झाले आहे आणि त्यांना तातडीने एम्समध्ये उपलब्ध नसलेल्या औषधाची आवश्यकता आहे. त्यानंतर फोन करणाऱ्याने मुलाला क्यूआर कोड स्कॅनर पाठवला आणि मुलाने पैसे ट्रान्सफर केले. परंतु नंतर, असे आढळून आले की, एम्सने अशी कोणतीही मागणी केलेली नाही किंवा त्याच्या वडिलांना कोणताही संसर्ग झाला नाही. मग सायबर फसवणूक करणाऱ्याला त्याच्या वडिलांची एम्समध्ये शस्त्रक्रिया सुरू आहे, हे कसे कळले? असा प्रश्न पीडित आणि पोलिसांना पडला असून ते गोंधळलेले आहेत.

तिसरी घटना १७ ऑक्टोबर रोजी मुंबईतील माझगाव येथे घडली आहे. एका फिजिओथेरपिस्ट महिलेचे वडील मध विकतात आणि एका सायबर फसवणूक करणाऱ्याने हे सबब वापरून तिची ९०,००० रुपयांची फसवणूक केली. फसवणूक करणाऱ्याने हुशारीने पैसे "चुकून ट्रान्सफर" झाल्याची एक कथा रचली आणि तिला वेगवेगळ्या मोबाइल नंबरवर वारंवार पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडले.

फिजिओथेरपिस्टने पोलिसात केलेल्या तक्रारीनुसार, १७ ऑक्टोबर रोजी सकाळी तिच्या बँक खात्यात अंदाजे ९०,००० शिल्लक होते. सकाळी ११.३० च्या सुमारास तिला एक व्हॉट्सअ‍ॅप फोन आला. फोन करणाऱ्याने दावा केला की, त्याने तिच्या वडिलांकडून मध खरेदी केलं आहे आणि त्यांना ५,००० रुपये देणे आहे. तसेच फोन करणाराने तिच्याकडे गुगल पे आहे का? असे देखील विचारले. फिजिओथेरपिस्टने ह्होह्व असे उत्तर दिल्यानंतर, थोड्याच वेळात एक बनावट बँक मेसेज आला, ज्यामध्ये तिच्या खात्यात ५०,००० ट्रान्सफर करण्यात आले आहेत, असे म्हटले होते. त्यानंतर त्याच व्यक्तीने पुन्हा फोन केला आणि दावा केला की, त्याने चुकून ५,००० ऐवजी ५०,००० पाठवले आहेत आणि ४५,००० परत करण्याची मागणी केली.

जेव्हा फिजिओथेरपिस्टने गुगल पे अ‍ॅप उघडले, तेव्हा तिला कोणतेही पैसे दिसले नाहीत. तथापि, कॉलरने पैसे पाठवल्याचा आग्रह धरला. "नेटवर्कमध्ये समस्या असू शकते, म्हणूनच तुमच्या बॅलन्समध्ये पैसे दिसत नाहीत," असेही तो म्हणाला. फोन करणारा व्यक्ती वारंवार पैसे परत करण्यासाठी तिच्यावर दबाव आणत होता. फोन करणाऱ्या व्यक्तीच्या दबावाला बळी पडून फिजिओथेरपिस्टने प्रथम सुरूवातीला २०,००० आणि नंतर २५,००० रुपये फोन करणाऱ्या व्यक्तीने दिलेल्या दोन वेगवेगळ्या गुगल पे खात्यांमध्ये पाठवले. त्यानंतर काही वेळातच फिजिओथेरपिस्ट आणखी एक बनावट संदेश मिळाला की, तिच्या खात्यात ४५,००० जमा झाले आहेत. फोन करणाऱ्या व्यक्तीने दावा केला की, तिने पाठवलेले २०,००० आणि २५,००० रुपये तुमच्या खात्यात परत आले आहेत आणि ते तुम्ही मला परत पाठवा. त्यामुळे फिजिओथेरपिस्टने फोन करणाऱ्या व्यक्तीला पुन्हा ४५,००० रुपये परत पाठवले.

दरम्यान, काही वेळाने फिजिओथेरपिस्टने तिचे बँक बॅलन्स तपासले, तेव्हा तिच्या लक्षात आले की, तिच्या खात्यात फक्त ११० रुपये शिल्लक आहेत. यानंतर तिच्या लक्षात आले की, ती सायबर फसवणुकीची बळी ठरली आहे. तिने ताबडतोब भायखळा पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. पण फिजिओथेरपिस्टला हा प्रश्न पडला आहे की, सायबर फसवणूक करणाऱ्याला तिचे वडील मध व्यापारी आहेत, हे कसे कळले.

### विरोधकांनी कितीही लवंग्या-सुरसुरी फोडल्या तरी...

## निवडणुकांपूर्वी शिंदेंचं ओपन चॅलेंज

**■ठाणे। प्रतिनिधी,**

विरोधकांनी आता कितीही लवंग्या-सुरसुरी फोडल्या, तरी आम्ही त्याकडे पाहतही नाही! कारण महायुतीकडे अ‍ॅटम बॉम्ब आहे आणि तो फुटला की विरोधकांचे राजकीय अस्तित्व उडून जाईल, असा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी ठाण्यात दिला. महायुतीसोबत महाराष्ट्राची जनता ठामपणे उभी आहे, म्हणून आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पूर्ण बहुमताने आमचीच सत्ता येणार, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. ठाण्यातील विविध दिवाळी पहाट कार्यक्रमांना शिंदे यांनी हजेरी लावली. यावेळी ते बोलत होते.

विरोधक दररोज आरोपांचे फटाके फोडतात, परंतु त्यांच्या त्या फुसक्या लवंग्यांचा आमच्यावर काहीच परिणाम होणार नाही! आम्ही कामगिरीच्या अ‍ॅटम बॉम्बने महाराष्ट्र उजळवणार आणि विरोधकांचा धुरळा उडवणार आहोत. आमचे लक्ष विकासावर आहे; आणि विरोधकांचे काम फक्त आरोप, टीका करणे आहे,



**विरोधकांना पराभव दिसू लागला**

विरोधकांना आता पराभव दिसू लागला आहे. म्हणूनच ते निवडणूक आयोग, ईव्हीएम, महायुती आणि आम्हाला दोष देतात. निवडणुका होऊ शकल्या नाहीत कारण सर्वोच्च न्यायालयात याचिका होती. त्याला आम्ही जबाबदार नाही, असे शिंदे म्हणाले.

असेही ते म्हणाले. यावेळी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, माजी महापौर मीनाक्षी शिंदे उपस्थित होते.

शेतकरी संकटात असताना शिवसेना आणि महायुती सरकार त्यांच्यासोबत उभे आहे. आम्ही दिलेले वचन पाळले. शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदतीचा पैसा पोहोचतोय. या पुरात धाराशिव जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांच्या गाई वाहून गेल्या, त्या शेतकऱ्यांना १०१ दुभत्या गायी देण्याचाही निर्णय परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे.

शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेणे ही आमची संस्कृती आहे, असे ते म्हणाले. संकटात धावून जाणे हे आम्हाला बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांनी शिकवले आहे. त्यामुळे आम्ही केवळ बोलत नाही, कृती करून दाखवतो. पूर परिस्थितीत केंद्राने मोठी मदत केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्तक्षेपामुळे ती शक्य झाली, असे शिंदे यांनी नमूद केले.

## पुणे-जैन बोर्डिंग प्रकरणात दणका!

### जागा हडपण्याचा डाव फसला, आयुक्तांचा मोठा आदेश




**■पुणे । प्रतिनिधी,**

पुण्यातील जैन बोर्डिंग जमीन व्यवहाराला अखेर मुंबईच्या धमार्दाय आयुक्तांनी तात्पुरती स्थगिती देत जैसेथेची ऑर्डर दिली आहे. या निकालाबाबत जैन बांधवांचे याचिकाकर्ते समाधानी आहेत पण खासदार मोहोळांना या वादात ओढणाऱ्या धंगेकरांना मात्र अजूनही हे सर्व षडयंत्रच वाटत आहे. जैन बोर्डिंगचा नेमका काय वाद हे ते समजून घ्या.

पुण्यातली मॉडेल कॉलनीतली हिच ती जैन बोर्डिंग. जैन बोर्डिंगच्या ३ एकर जमिनीच्या संशयास्पद जमीन खरेदी व्यवहारावरून थेट केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ अडचणीत आले होते. मोहोळ यांचे पूर्वीश्रमीचे व्यावसायिक भागिदार विशाल गोखले यांनी जैन बोर्डिंगच्या ट्रस्टी लोकांशी हाताशी धरून मोक्याची ३ एकर जागा अवघ्या २३० कोटींना घशात घातल्याचा आरोप राजू शेट्टी यांनी गेल्याच आठवड्यात मोर्चा काढून केला होता.

या जैन बोर्डींगच्या जागेचा व्यवहार करताना या परिसरातलं महावीर मंदिरच खरेदीखतांतून गायब केल्याचा गंभीर आरोप झाल्याने पुण्यातील जैन बांधवांनी मोर्चा काढून संताप व्यक्त केला. या वादात मग कसब्याचे माजी आमदार रवी धंगेकरांनीही उडी घेत खासदार मोहोळांवर थेट जमीन चोरीचे गंभीर आरोप केला. त्यावर मोहोळांनी जाहिर खुलासा करत सरळ हात झटकले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com